REGISTERED No. B. 3434


**अर्थ**

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार,
इत्यादि विषयांस वाहिलेलें साप्ताहिक.

**प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.**

*वर्गणीचे दर :*

वार्षिक : ६ रु. सहामाही : ३ रु.

**किरकोळ अंक : ४ आ.**

*जाहिरातीचे दर :*

कराराच्या व इतर अटी जाहिरातखात्याकडून मागवाव्यात.
चेक, मनिऑर्डरी, इ. पाठविण्याचा पत्ता:–

" अर्थ "
" *दुर्गाधिवास* " पुणें ४.


# अर्थ

वर्ष १५ पुणें, बुधवार तारीख २१ सप्टेंबर, १९४९ अंक ३८


## धी कोपरगांव पीपल्स को. ऑ. बँक लि.

**कोपरगांव, जि. अहमदनगर.**

( उद्‌घाटन समारंभ : ता. १७–१–१९४९ )

कोपरगांव येथील अत्यंत प्रतिष्ठित नागरिक यांचे देखरेखीखालीं स्थापित झालेली आणि आधुनिक पद्धतीवर बँकिंगचे सर्व व्यवहार करणारी

**स्थानिक सहकारी बँक**

**सुरुवातीचें शेअर भांडवल : ६८,७५० रु.**

बिलें वसुली, हुंड्या, मुंबईवरील चेक्स, ड्राफ्ट्स, वगैरे व्यवहार केले जातात.

आकर्षक व्याजावर मुदतीच्या ठेवी ३ महिनेपासून ५ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातील.

सेव्हिंग्ज बँकेंत रु. १०,००० पर्यंत व्याज देणेंत येतें.

**विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा.**

जी. पी. ठाणेकर, बी. ए. मॅनेजर. | मोहनलाल कालिदास व्यास चेअरमन.



स्थापना १९३६

## युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

*पॅलेस स्ट्रीट, सातारा.*

शाखा:—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३१–१२–४८ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ५,००,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,३१,००० |
| ठेवी | रु. | ७१,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ८९,००,००० |

**मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :**

| १ वर्ष | दोन वर्षे | तीन अगर अधिक वर्षे |
|---|---|---|
| रु. २–८–० | रु. २–१२–० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १–८–० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | २–०–० |
| चालू डिपॉझिट | " | ०–८–० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर. वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल्. बी., चेअरमन



## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

## ( शिड्यूल्ड बँक )

## प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग

**पुणें २.**

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | ७,१५,१६५ |
| खेळतें भांडवल | रु. | ७१,००,००० |

मुंबई शाखा:—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर. श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर.



तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** बुधवार चौक, पुणें

## सोसायट्यांस विनंति

किर्लोस्कर कंपनी सोसायट्यांना ज्या भावांत माल देते त्याच भावांत आम्हीहि नांगर वगैरे माल पुरवितों. आपली कोणतीहि ऑर्डर आपण आमचे मार्फत पाठविण्यानें तोटा नसून फायदाच आहे. सर्व तऱ्हेची सोसायट्यांना लागणारी माहिती व इतरहि माल आम्ही पुरवितों.

या वर्षाची ऑर्डर आमचे मार्फतच पाठवा.

केळकर बंधु, पुणें व नाशिक.


## विविध माहिती

**ब्रिटनचें औद्योगिक प्रदर्शन**—१९५० च्या ८ मे पासून सुरू होणाऱ्या ब्रिटनमधील औद्योगिक प्रदर्शनाच्या तयारीस प्रारंभ करण्यांत आला आहे. प्रदर्शनाला १,२०,००० परदेशीय संभाव्य गिऱ्हाइकांना बोलावण्यांत येणार आहे. ह्या वर्षीच्या प्रदर्शनासाठी १,०४,००० आमंत्रणें देण्यांत आलीं होतीं. १,२०,००० गिऱ्हाइकांना व्यक्तिगत पत्रें ह्याच महिन्यांत पाठविण्यांत येणार आहेत. त्यानंतर ऑक्टोबर महिन्यांत रीतसर आमंत्रणें पाठविलीं जातील. ह्या आमंत्रण पत्रिकाच इंग्लंडमध्यें येण्याचे परवाने म्हणून मानले जातील. त्यानंतर प्रदर्शनासंबंधीं माहिती देणाऱ्या पुस्तिका धाडण्यांत येणार आहेत. त्यांतील माहितीमुळें गिऱ्हाइकांना आपल्या खरेदीविषयीं आगाऊ विचार करता येईल.

**अमेरिकन भांडवलाच्या अटी**— मागासलेल्या देशांना अमेरिकन भांडवल पाहिजे असेल तर त्यांनीं त्या बाबतींतील अडथळे दूर केले पाहिजेत असें अमेरिकेच्या अर्थ खात्याचे चिटणीस मि. जॉन स्नायडर ह्यांनीं एका प्रसंगीं बोलून दाखविलें. त्यांनीं अमेरिकन भांडवलाच्या गुंतवणुकीसाठी तीन अटी घातल्या आहेत:— (१) पैसे गुंतविणारांना पटतील अशा योग्य सवलती (२) नफ्याचे डॉलर्समध्यें रूपांतर करण्याची परवानगी, आणि (३) उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयीकरण झाल्यास नुकसानभरपाई पौंडाच्या कक्षेतील देशांना सध्या जी डॉलर्सची चणचण भासत आहे ती कमी करण्यासाठी एका योजनेची रूपरेखाही मि. स्नायडर ह्यांनीं जाहीर केली आहे.

**शिष्यवृत्त्यांसाठी फंड**—येत्या पांच वर्षांत पाकिस्तानांतील १००० विद्यार्थ्यांना उच्च आणि तांत्रिक शिक्षण देण्यासाठी परदेशांत पाठविण्याचा पाकिस्तान सरकार विचार करीत आहे. ह्या परदेशांतील शिक्षणक्रमासाठी २ कोटी रुपयांचा एक फंड उभारण्याचें घाटत आहे.

**इंग्लंड-रशिआ व्यापारी करार**—ब्रिटननें रशियाशीं एक सौदा पटविला आहे. सौद्याच्या अटीप्रमाणें रशिया ब्रिटनला १०,००,००० टन धान्य पुरवणार आहे. त्यापैकीं ५,००,००० टन बार्ली, ४,०४,००० टन मका आणि १,००,००० टन ओट्स अशी वर्गवारी आहे. हें धान्य ब्रिटनमध्यें लवकरच येऊं लागेल.

**बडोद्याच्या हत्तींचें दक्षिणप्रयाण**—बडोद्याच्या हत्तीखान्यांतील दोन हत्ती दक्षिण हिंदुस्थानांतील देवळाच्या समारंभांत मिरविण्यासाठी म्हणून एका हत्तीच्या व्यापाऱ्यानें विकत घेतले आहेत. ह्या दोन हत्तींचें मिळून वय ११५ वर्षांचें आहे. प्रत्येक हत्तीसाठी २ हजार रुपये किंमत देण्यांत आली. हाच व्यापारी कोल्हापूर संस्थानचे दोन हत्ती मलबारमधील जंगलांत कामाला लावण्यासाठी नेणार आहे.

**कानपूरसाठी नवी विद्युत यंत्रें**—कानपूरमधील विजेच्या पुरवठ्याचें केंद्र आतां सरकारी मालकीचें आहे. केंद्रासाठी संयुक्त प्रांत सरकारनें १५००० किलोवॅट शक्तीची यंत्रसामुग्री इंग्लंडहून मागविली आहे. त्यासाठी ९५,००,००० रुपये द्यावे लागतील. कानपूरमधील वीज कोळशाच्या इंजिनाचा उपयोग करून निर्माण केली जाते. हें विजेचें केंद्र आपल्या देशांतील दुसऱ्या प्रतीचें आहे. प्रांतांतील अशा प्रकारच्या विद्युत्-निर्मितीच्या सर्व केंद्रांपेक्षां कानपूरच्या केंद्राचें विद्युत्-उत्पादन दुप्पट आहे.

**टॅक्सीसाठी नवा मीटर**—दक्षिण ऑस्ट्रेलिआंत टॅक्सीवर बसविण्यासाठी एका नव्या प्रकारच्या मीटरचा शोध लावण्यांत आला आहे. ह्या मीटरमध्यें, मैलांचे आंकडे, टॅक्सी थांबल्याचा काळ आणि भाडें ह्या बाबी दाखविण्याची सोय केलेली आहे.

**मूल बदलण्याची भीती नको**—टॅस्मॅनिआ (ऑस्ट्रेलिआ) मधील एका इस्पितळांत मूल जन्मतांच एका मिनिटांत त्याच्या पायाचे ठसे आणि त्याच्या आईच्या बोटांचे ठसे घेण्याची व्यवस्था केली आहे. ह्या व्यवस्थेमुळें भलतेंच मूल भलतीच बाई घेऊन जाण्याची शक्यता नाहींशी झाली आहे.

**सूक्ष्म यंत्रें बनविणारा पहिला कारखाना**—मोठमोठ्या यंत्रांतील नाजूक आणि सूक्ष्म भाग तयार करण्याचा पहिला हिंदी कारखाना लखनौ येथें निघणार आहे. अशा प्रकारचा हिंदमधील हा एकमेव कारखाना होईल. ह्या कारखान्यासंबंधीं, संयुक्त-प्रांत सरकारनें जर्मनींतील एका मोठ्या इलेक्ट्रिकल कारखान्याचे डायरेक्टर मि. अर्नेस्ट गुंथर ह्यांचें साह्य घेण्याचें ठरविलें आहे. मि. गुंथर सध्या लखनौलाच असून लवकरच ते स्वित्झर्लंडला जाणार आहेत. परत येतांना आपल्या बरोबर जर्मन तज्ज्ञ आणण्याचा त्यांचा विचार आहे.

**ब्रम्हदेशाचें तुटीचें अंदाजपत्रक**—ब्रम्ही अर्थमंत्री यू टिन ह्यांनीं १९४९-५० चें अंदाजपत्रक ब्रम्ही विधिमंडळास नुकतेंच सादर केलें. ह्या वर्षी ५७,३५,७७,००० रुपये जमा धरलेली असून ५९,६०,०४,००० रुपये खर्च होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. अंदाजपत्रकांत १,७०,००,००० रुपयांची तूट दाखविण्यांत आली आहे. संरक्षणासाठी होणाऱ्या खर्चाचा अंदाज १३,४८,००,००० रुपये करण्यांत आला आहे.

**मुंबई प्रांतासाठी सीमेंट**—मुंबई प्रांतासाठी हिंद सरकारनें महिना १५,७०० टन सीमेंट मंजूर केलें आहे. ह्या वांटपापैकीं ३० टक्के सीमेंट पी. डब्ल्यू. डी. आणि इतर सरकारी खात्यांना दिलें जातें. ३० टक्के सीमेंट "अधिक धान्य पिकवा" मोहिमेंतील बांधकामासाठी, १० टक्के सामान्य जनतेसाठी आणि उरलेलें कारखान्यांच्या बांधणीसाठी दिलें जाईल. सध्या प्रांतांतील सीमेंट वाटपाचा अधिकार रिजनल ऑनररी सीमेंट ॲडव्हायजर (मुंबई) ह्यांच्याकडे आहे. तो लवकरच प्रांतिक सरकार स्वतःकडे घेणार आहे असें समजतें.

**रशिआकडून तेलाची निर्यात**—रशिआला आणि पूर्व युरोपांतील राष्ट्रांना स्वतःला जळाऊ तेलाचा पुरवठा भरपूर नसतांही, त्यांनीं पौंडाच्या कक्षेतील देशांना तेल निर्यात करण्यास प्रारंभ केला आहे असें समजतें. पोलंड ऑस्ट्रेलिआला ३,५००,००० गॅलन पेट्रोल निर्यात करणार असल्याचें कॅनबेरा येथें नुकतेंच जाहीर झालें आहे. रशियाकडून आणि रुमेनिआकडून तेल आयात करण्यासंबंधींही ऑस्ट्रेलिआशीं वाटाघाटी चालू आहेत. पोलंडच्या ताब्यांतील गॅलीशिआमधील तेलाच्या खाणी आतां रशिआच्या ताब्यांत गेल्यामुळें पोलंड करीत असलेल्या तेलाच्या निर्यातीबद्दल आश्चर्य व्यक्त करण्यांत येत आहे.

# अर्थ

बुधवार, ता. २१ सप्टेंबर, १९४९



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र


## पाकिस्तानाचें जागतिक घडामोडींत स्थान

गेल्या कांहीं वर्षांत राजकारणामागील आर्थिक धागेदोरे अधिकाधिक स्पष्ट होऊं लागले आहेत. लंडनमधील सुप्रसिद्ध 'इकॉनमिस्ट' ह्या साप्ताहिकांत पाकिस्तानकडे व्यापारी ब्रिटन कोणत्या दृष्टीनें पहातें ह्यासंबंधीं उद्बोधक माहिती आली आहे. तिचें सद्यः परिस्थितींत विशेष महत्त्व असल्यानें, वाचकांस तिचा परिचय करून देणें आवश्यक आहे.

कॉमनवेल्थ राष्ट्रगटांत पाकिस्तानला जें काय महत्त्व देण्यांत आलें आहे, त्याबद्दल पाकिस्तान असमाधानी आहे. शिवाय, आशियांतील आर्थिक हक्कांना आणि योजनांना युरोपच्या मानानें जें दुय्यम महत्त्व दिलें जातें त्याबद्दलही पाकिस्तान नाखूष आहे. ह्या असमाधानी वृत्तींतूनच पाकिस्तानचे मुख्य प्रधान मि. लिआकत अली खान ह्यांनीं मॉस्कोला जाण्याचा निर्णय घेतला असावा, असें दिसतें. मध्यपूर्वेतील प्रश्नांत पाकिस्तानचे हितसंबंध निगडित आहेत, ह्याकडे बहुधा फारसें लक्ष दिलें जात नाहीं. तथापि, मध्यपूर्वेतील प्रश्नांचा ब्रिटिश सरकार विचार करीत असतांना पाकिस्तानच्या मध्यपूर्वेतील स्थानाचा विचार न करून चालणार नाहीं.

हिंदुस्थान हा देश एक शतक तरी ब्रिटनचें सर्वांत शहाजोग गिऱ्हाइक आहे. असें असून सुद्धा हंगेरी सारख्या देशांशीं व्यापारी बोलणीं करण्याकडे अधिक लक्ष दिलें जातें. हिंदुस्थानला आणि पाकिस्तानला आज खतांची आणि कालवे–पाटबंधाऱ्यांसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्रीची जरूरी आहे. ह्या गोष्टी त्यांना पुरविण्याकडे अधिक लक्ष दिलें जाणें आवश्यक आहे. हें साहित्य त्यांना पुरविण्यांत आलें, तर ह्या देशांना कापूस आणि गळिताचीं धान्यें अधिक प्रमाणांत निर्यात करणें शक्य होईल आणि त्यामुळें पौंडाच्या गटांतील देशांना दुर्लभ चलनाची (डॉलर्सची) जी चणचण भासते ती थोडी तरी कमी होईल. विसाव्या शतकांतील उदारमतवादी राजकारणाचा सर्वांत मोठा विजय म्हणजे हिंदुस्थानला देण्यांत आलेलें स्वातंत्र्य; पण कम्युनिझमचा लोंढा थोपविण्यासाठी सरदार पटेल अगर मि. लिआकत अली खान ह्यांच्याकडे अधिक लक्ष देण्याऐवजीं बाओ दाय (इंडोचायना) आणि पिबुल सोंग्रम (सयाम) ह्यांना मदत देण्याची भाषा अधिक प्रमाणांत बोलली जाते. आशिया खंडांत हिंदुस्थान आणि पाकिस्तान हेच काय ते दोन देश, स्वतंत्र लोकशाह्या म्हणून नांदत आहेत. आशिया खंडांतील स्वतंत्र लोकशाहीचें यशापयश ह्या दोन देशांच्या यशापयशावर अवलंबून आहे ही गोष्ट फारशी लक्षांत घेतलेली दिसत नाहीं.

### डॉलर मिळविणारें राष्ट्र

हिंदुस्थान आणि पाकिस्तान ह्यांचा एकदमच विचार करण्याची संवयच पडून गेलेली आहे. एकाच्या सामर्थ्याचा उपयोग दुसऱ्याचा तेजोभंग करण्यासाठी करण्यांत येत आहे. वास्तविक जर्मनी अगर जपानपेक्षां हिंदुस्थान निर्यातीच्या दृष्टीनें अधिक महत्त्वाचा देश आहे. पण, हिंदुस्थानच्या व्यापारासंबंधीं बोलतांना हिंदुस्थानला अन्नधान्याची आयात करावी लागते, पाकिस्तान मात्र त्याबाबतींत स्वयंपूर्ण आहे येवढीच गोष्ट विचारांत घेतली जाते. उलटपक्षीं विचार करतांना हिंदुस्थान पाकिस्तानपेक्षां मोठा आहे, त्याजवळ अधिक तंत्रज्ञ आहेत, पाश्चात्य शिक्षणाचा अधिक प्रसार त्यांत झालेला आहे, ह्या गोष्टी लक्षांत घेतल्या जातात. परंतु पाकिस्तान आणि हिंदुस्थान ह्यांच्यांत असा भेदभाव करण्याचें कारण नाहीं. हिंदुस्थानशीं मैत्री असली म्हणजे पाकिस्तानकडे दुर्लक्ष करावें असें नाहीं. पाकिस्तान जन्माला येऊन उणीपुरी दोनच वर्षें झालीं आहेत. ह्या अवधींत पाकिस्तान सरकारचे हात अनेक प्रश्नांत गुंतले होते. परंतु त्या सर्वांपेक्षा काश्मीरमधील भांडणामुळें पाकिस्तानवर एक प्रकारची छायाच पडली आहे. ह्या भांडणामुळें पाकिस्तानला आपल्या अंदाजपत्रकांतील तीन चतुर्थांश उत्पन्न सैन्यावर खर्च करावें लागलें आहे. पाकिस्तानच्या पौंडी शीलकींपैकीं एक शतांश हिस्सा संरक्षणाच्या साधनसाहित्यावर खर्च करावा लागला आहे. तथापि पाकिस्तानचें सरकार ह्या सर्व अडचणींना तोंड देत आहे आणि त्यांचा निरासहि आतां होऊं लागला आहे. १९४८ सालीं पाकिस्ताननें जितके डॉलर्स खर्च केले त्यापेक्षां अधिक मिळविले. १९४९–५० सालीं पाकिस्तानचा परदेशी व्यापार समतोल होईल असा अंदाज आहे. इंग्लंडमधून आयात होणाऱ्या मालावर फारच थोडीं बंधनें असतांना ही परिस्थिति आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. पाकिस्तानपुढें अजूनहि बऱ्याच अडचणी आहेत. तथापि दहा वर्षें पुढें नजर टाकली तर पाकिस्तान हें राष्ट्र डॉलर्स मिळविणाऱ्या व वांचविणाऱ्या राष्ट्रांपैकीं एक मोठें राष्ट्र होऊं शकेल, हें लक्षांत येण्यासारखें आहे.

### उत्पादनांत वाढ होण्यास वाव

उत्तर अमेरिकेकडून मिळूं शकणारे जिन्नस दुसरीकडे मिळूं शकत नाहींत म्हणून जगाला डॉलर्सचा तुटवडा पडला आहे अशी वस्तुस्थिति नाहीं. इतर देशांतही कापूस, तंबाखू, गहूं आणि तेल ह्यांची पैदास होते परंतु ती पुरेशी नाहीं. पाकिस्तानांत अमेरिकन जातीचा कापूस दर वर्षी १० लाख गाठी इतका निर्माण होतो परंतु सुलभ चलनाच्या जगांतील भागांना चौपट अधिक कापसाची जरूरी आहे. पाऊसपाणी चांगलें झालें तर पाकिस्तानांत दर वर्षी ५ लाख टन वरकड अन्नधान्य निर्माण होऊं शकतें; पण, हिंदुस्थान एकटाच १९४९ सालीं ४० लाख टन धान्य आयात करीत आहे. अर्थातच इतका मोठा तुटवडा भरून काढण्याइतकें उत्पादन त्वरित वाढविणें पाकिस्तानला शक्य होणार नाहीं. परंतु इतर कोणत्याही देशापेक्षा पाकिस्तानमध्यें ह्या बाबतींत अल्पावधींत कांहीं तरी करतां येण्यासारखें आहे. त्यासाठी लागणारा पैसा पाकिस्तानच उभारूं शकेल. येत्या कांहीं वर्षांत पाकिस्तानांत पाटबंधारे आणि पडीक जमिनी लागवडीस आणणें, ह्या दोन कार्यक्रमामुळें ६०,००,००० एकर जमिनी नव्यानें पिकाखालीं आणल्या जातील. इतकें झालें तर अन्नधान्याच्या निर्मितींत २०,००,००० टनांची आणि कापसाच्या निर्मितींत ५ लाख

गाठींची वार्षिक भर पडणें शक्य आहे. त्यामुळें दर वर्षी ५ कोटी डॉलर्सची बचत होऊं शकेल. पाकिस्तानमधील तांदुळाचें दर-एकरी उत्पादन जपानच्या एक तृतीयांश आहे, आणि गव्हाचें दर एकरी उत्पादन ब्रिटनच्या निम्म्या पेक्षाही कमी आहे. आधुनिक खतें, कीड मारणारीं औषधें, इत्यादींचा उपयोग पाकिस्तानांत फार थोडा करण्यांत येतो. पाकिस्तानांत वापरण्यांत येणारें बीं-बियाणें सुधारलेल्या जातींचें नसतें. सल्फेट ऑफ अमोनिआ, डी. डी. टी., इत्यादींचा उपयोग करून प्रात्यक्षिकें दाखविण्यांत आलीं तर पाकिस्तानच्या शेतींत आमूलाग्र फरक करतां येईल. पाकिस्तानांतील कापसाचें उत्पादन अमेरिकेच्या निम्म्या इतपत जरी वाढवितां आलें, तरी पाकिस्तानची कापसाची निर्यात ५ लाख गाठींनीं अधिक होईल.

### लष्करी महत्त्व

हें सर्व प्रत्यक्षांत उतरण्यासाठी पाकिस्तानला धरणें बांधण्यासाठीं लागणारीं यंत्रें, खतें, सुधारलेल्या नांगरासाठीं पोलाद, एंजिनिअर्स, शेतकी तज्ज्ञ ह्यांची जरूर आहे. ह्या वस्तू जर पाकिस्तानला आधीं पुरविण्यांत आल्या तर पाकिस्तानच्या भूमीचें उत्पादन १० वर्षांत इतकें वाढूं शकेल, कीं त्यामुळें दरवर्षी १० कोटी डॉलर्सच्या परकीय हुंडणावळीची बचत होईल. शिवाय दुसरीही एक शक्यता आहे. पाकिस्तानांत १९४८ सालीं जितक्या एकर जमिनींत ताग लावला होता तेवढ्या जमिनींत जर आज लावला तर अमेरिकेंतील तागाच्या मालाची विक्री युद्धपूर्व कालाइतकी करता येईल. सध्या युद्धपूर्वकालाच्या ३/४ येवढाच तागाचा माल अमेरिकेंत निर्यात होतो आणि खपतो. मलायाचें डॉलर्सचें वार्षिक उत्पन्न ६ कोटींचें आहे. त्यापैकीं निम्में मलाया स्वतःसाठीच खर्च करतो. कांहीं तज्ज्ञांचा असा अंदाज आहे, कीं १९६० च्या सुमारास, पाकिस्तान मलायाच्या दुप्पट डॉलर्स मिळवूं अगर वाचवूं शकेल. उलट पाकिस्तानला लागणाऱ्या वस्तू म्हणजे, कापड, गिरण्यांचीं यंत्रें, रेल्वेचें सामान, कोळसा, इत्यादि, पौंडाच्या गटांत असणाऱ्या देशांकडूनही पुरविता येतील.

मध्यपूर्वेत झालेल्या घडामोडींमुळें पाकिस्तानचें लष्करी महत्त्वही वाढलें आहे. विमानांच्या वाढत्या महत्त्वामुळें आतां पूर्व भूमध्यसमुद्र युद्धांत धोक्याचा होणार आहे. अर्थातच ईजिप्तसारख्या देशापेक्षा आज पाकिस्तानला अधिक महत्त्व आलें आहे. पाकिस्तानांतील लष्करी तळ अधिक महत्त्वाचे झाले आहेत. इराणच्या सरहद्दींचें रशियापासून संरक्षण आज केल्याहून ज्यास्त चांगलें होऊं शकेल.

### वाचकांचा पत्रव्यवहार

#### जे. आर. डी. टाटा

सा. नमस्कार वि. वि. गेल्या दोन अंकांत टाटाबद्दल लिहितांना आपण "सर" जे. आर डी. टाटा असें लिहिलें. परंतु ते "सर" नाहींत. पुढील खेपेस सुधारून घ्यावें. ग. कृ. चितळे.

### पौंडाच्या घसरगुंडीचें गणित

ब्रिटिश फडणवीस, सर स्टॅफर्ड क्रिप्स, ह्यांनीं पौंडाची किंमत उतरविल्याची घोषणा केली आहे. पूर्वी १ पौंड = ४ डॉलर, ३ सेंट अशी कागदोपत्रीं हुंडणावळ होती परंतु व्यवहारतः पौंडाला इतके डॉलर मिळत नसत. आतां १ पौंड = २ डॉलर, ८० सेंट असा नवा दर जाहीर करण्यांत आला आहे. म्हणजे, पौंडाची घसरगुंडी अपेक्षेपेक्षाहि ज्यास्त गृहीत धरण्यांत आली आहे. पुनः लवकर पौंडाची किंमत आणखी उतरविण्याचा प्रसंग येऊं नये, ह्याची ही व्यवस्था आहे. पौंडाची किंमत उतरविल्यामुळें स्टर्लिंग गटांतील सर्व देशांना त्यांच्या चलनाची किंमतहि उतरविणें भाग पडलें आहे. हिंदुस्थानानेंहि रुपयाची प्रमाणशीर किंमत कमी करण्याचें ठरविलें आहे. पौंडाच्या किंमतीमधील उतारामुळें जागतिक आर्थिक प्रश्नांच्या चर्चेस मोठीच चालना मिळाली आहे; कारण चलनाची किंमत कमी केल्यानें केवळ हे प्रश्न सुटणारे नाहींत.

पौंडाची आजची कृत्रिम व अव्यवहार्य किंमत उतरविल्यामुळें काय परिणाम होईल? सोईसाठी, पौंडाची किंमत २०% कमी केली आहे, असें समजू. त्याचा अर्थ पौंडाची परराष्ट्रांत २०% किंमत कमी होईल. १२ पेन्सांचा १ शिलिंग व २० शिलिंगांचा १ पौंड, हें कोष्टक कायमच राहील, परंतु ब्रिटिश मालाचा (त्यांतच लँकेशायरच्या कापडाप्रमाणें मलायाच्या रबराचाहि समावेश होतो.) अमेरिकन खरेदीदार डॉलरमध्यें २०% रक्कम कमी देईल. सध्या तो पौंडी किंमतीच्या मालास ४ डॉलर देत असेल तर ह्यापुढें ३·२० डॉलरच देईल. विकणाऱ्याला मात्र पूर्वी इतकेच पौंड मिळतील. अमेरिकेंत ब्रिटिश लोक माल खरेदी करतील, त्यांस २५% ज्यास्त रक्कम द्यावी लागेल. पूर्वी ४ डॉलरला १ पौंड दिला तर आतां १¼ पौंड द्यावे लागतील. म्हणजे २५% किंमतींत वाढ होईल. ब्रिटिश मालाच्या डालरवाल्या अमेरिकन खरेदीदारास चार पंचमांश व अमेरिकन मालाच्या पौंडवाल्या इंग्रज खरेदीदारास पांच चतुर्थांश ह्या प्रमाणांत नव्या किंमती द्याव्या लागतील. ह्या किंमती टिकतील, असें मुळींच नाहीं. मागणी-पुरवठ्यावरच त्या अखेर अवलंबून रहातील. डॉलरमधील मालाच्या किंमतींची चढीकडे व पौंडी मालाच्या किंमतीची उतरणीकडे असण्याची प्रवृत्ति राहील, एवढेंच आज सांगतां येईल. डॉलर गटाकडे ब्रिटिश मालाची निर्गत किती वाढेल, ह्यावरच पौंडाची किंमत उतरण्याचा सुपरिणाम अवलंबून राहील. पौंडाची किंमत उतरविली, परंतु त्याबरोबर उत्पादन वाढलें नाहीं तर अपेक्षित सुधारणा होणार नाहीं. कारण पूर्वीइतकाच विदेशी (अमेरिकन) माल हवा असल्यास निर्गतीच्या मालांत वाढ होणें अगत्याचें असतें. पौंडाची किंमत कमी करण्याचा पहिला परिणाम इंग्लंडमधील किंमती वाढण्यांतच होईल. कच्चा माल बाहेरून आणावा लागतो तो महाग होणारच. कामगार ज्यास्त वेतन मागूं लागणें अशक्य नाहीं. ह्या सर्व गोष्टी नीट लक्षांत घेऊनहि पौंडाची किंमत उतरविणें भाग पडलें आहे, हें उघड आहे.

हौशी व अभ्यासू लेखक-वाचकांच्या आवडत्या अभिरुचीसंपन्न
"हिंद" मासिकाचा संग्राह्य दिवाळी अंक
(आकर्षक मुखपृष्ठ व सुंदर सजावट असलेला)
विकत घेण्यास व वाचण्यास विसरूं नका.
(प्रसिद्धीची तारीख १५ ऑक्टोबर १९४९)
किंमत फक्त एक रुपया. मनिऑर्डरनें मागवल्यास घरपोंच पाठवूं.
न्यूज एजन्टांनीं आपली मागणी आगाऊ रिझर्व करावी.
जाहिरातदारांना आपल्या मालाची जाहिरात करण्यास उत्तम क्षेत्र.
हिंद मासिक कार्यालय, आंग्रेवाडी, गिरगांव, मुंबई.

## व्यापारांतील खांचा खळगे.

लेः— ना. अ. तेंडोलकर,
मॅ. डायरेक्टर, दि हिंद एजन्सीज लि. कोल्हापूर.

महाराष्ट्रीय तरुणांना व्यापारांत पडण्याचा वारंवार सल्ला देण्यांत येतो, परंतु जे तरूण आकांक्षेनें प्रेरित होऊन व्यापारांत पडतात, त्यांचे वांट्यास कोणतें भाग्य येतें याची कल्पना व्यापारांत पडणाराखेरीज इतरांना क्वचितच येत असेल! आम्ही तरूण व्यापारांत पडतो, म्हणजे कसें पडतो व कां पडतो, हें विचार करण्यासारखें आहे.

इतर कोणत्याही उद्योगधंद्याप्रमाणें व्यापारासाठी (१) भांडवल (२) अनुभव व (३) व्यवस्था या तिन्हींचीही आवश्यकता आहे. व्यापाराचा अनुभव नाहीं म्हणून भांडवलदार, घरची मंडळी किंवा इष्टमित्र भांडवल देण्यास नाखुष असतात किंवा हात आखडता घेतात व अपुऱ्या भांडवलावर धंद्यास सुरवात करणें म्हणजे ठरल्याप्रमाणें गोत्यांत येणें होय. कारण, आपल्या धंद्याच्या खर्चाच्या प्रमाणांत प्राप्ति होणें हें पुष्कळ अंशीं आपल्या भांडवल उभारणीवरच अवलंबून असते.

आम्ही आमच्या व्यापार–उद्योगधंद्यांतील प्रगति ही पहिल्या चारसहा महिन्यांत किंवा वर्षादोन वर्षांत होणाऱ्या नफ्यातोट्याच्या रूपानें अजमावूं पहातो. जी आमची घरची वडील मंडळी, आप्त किंवा सहानुभूति असणारी इतर मंडळी आमच्या सर्वसामान्य शिक्षणासाठी आयुष्यांतील पंचवीस वर्षें खर्च झालीं, दहावीस हजार रुपये खर्च आला तरी तो आपुलकीनें करतात व नेहमीं उत्तेजन देत रहातात, तीच मंडळी आयुष्याची खरीखुरी सुरवात व्यापार उद्योगधंद्यानें करावयाची म्हटल्यास व असें थोडेंफार नुकसान व्यापाराच्या सुरवातीसच आल्यास निरुत्साही होतात व हात आखडता घेतात. "हें आमचें काम नव्हे!" असा उपदेश करूं लागतात. खरोखरच ज्यांत आम्हांस यश मिळवून पुढें जावयाचें असतें, त्यासाठी थोडाफार त्याग (व्यापारांतील नुकसानी) व परिश्रम वाया कां जाऊं नयेत?

व्यापार उद्योगधंद्यांत येणारें नुकसान ही व्यापार उद्योग धंद्यांतील धडे शिकण्यासाठी एका अर्थी दिलेली फीच असते व गेलेले फुकट दिवस व परिश्रम हा त्या शिक्षणाचा कालावधी असतो, अशी वृत्ती कां असूं नये?

सर्वसामान्यपणें व्यापाराचे तीन वर्ग पडतातः—

ठोकबंद व्यापार,
किरकोळ व्यापार, व
कॅटलॉग व नमुन्यांच्या सहाय्यानें करावयाचा व्यापार.

यापैकी पहिला वर्ग कारखानदाराकडून किंवा दुसऱ्या मोठ्या व्यापाऱ्याकडून मोठ्या प्रमाणावर खरेदी करीत असून इतर लहान सहान व्यापाऱ्यांना कारखानदाराच्या किंवा बऱ्याच सवलतीच्या भावांत माल पुरवीत असतो. किरकोळ गिऱ्हाइकांनाहि बाजारभावानें माल देत असतो.

दुसऱ्या प्रकारचा व्यापारी हा मुख्यत्वेंकरून गिऱ्हाइकांना त्यांच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठीं तात्काळ उपयोगासाठीं माल देत असतो.

तिसऱ्या वर्गाचा व्यापारी हा कारखानदारांचा प्रतिनिधि, दलाल अशा प्रकारचें काम करीत असतो. तो व्यापाराचे स्वरूपाप्रमाणें व्यापारी व गिऱ्हाइक या दोघांनाही आपण ज्यांचे प्रतिनिधी आहोंत त्यांचा माल कॅटलॉग व नमुने दाखवून ऑर्डर्स घेऊन आणवून देत असतो. गिऱ्हाईक व कारखानदार किंवा मोठे व्यापारी यांची सांगड घालणें हेंच ह्याचें मुख्य काम असतें.

व्यापाराचे असे जरी कांहीं प्रकार असले तरी यांतही कांहीं मूलतत्त्वें असून तीं सर्वांना सारखीच मार्गदर्शक आहेत.

महाराष्ट्रांतील व्यापार व कारखानदारी फारच थोड्या महाराष्ट्रीयांच्या हातीं असून सर्वसामान्य वर्ग मुख्यत्त्वेंकरून तीन प्रकारें विभागला गेला आहे. यापैकीं मोठा विभाग म्हणजे शेतकरी, शेती कामगार हा खेड्यावर पसरला आहे. दुसरा वर्ग म्हणजे कारखानदारींतील मजूर व "रामा" लोकांचा, म्हणजे पाणके, आचारी, घरगडी इत्यादींचा व तिसरा म्हणजे "तात्या" ऊर्फ शाळामास्तर, कारकून इत्यादींचा. यापैकीं पहिला किंवा दुसरा वर्ग व्यापार-उद्योगधंद्याविषयीं विचारहि करीत नाहीं तर यापैकीं जो राहता राहिला तिसरा वर्ग तोच मुख्यत्वेंकरून व्यापार उद्योगधंद्याकडे वळतो.

इतरत्र कोठें नोकरी वगैरे न मिळाल्यानें व्यापारांत पडणारा एक वर्ग व दुसरा म्हणजे महत्त्वाकांक्षेनें प्रेरित झालेला व नोकऱ्यांत आपल्या कर्तबगारीस वाव नाहीं असें आढळून आल्यामुळें व्यापाराकडे वळणारा. कसेंहि असलें तरी अशा तरुणांना अनुभवाचा अभाव व भांडवलाचा अपुरेपणा पुरेपूर जाणवतो. कारण, अशा वर्गाकडे जें भांडवल येतें तें मुख्यत्वेंकरून प्रॉव्हिडंट फंड, विमा, आप्तेष्टांची मदत, कर्ज, अशा प्रकारचेंच! साहजिकच त्यांना प्रयोग करणें परवडत नाहीं. धंद्यांत नुकसान, बुडतट आल्यास त्यापुढें टिकाव धरतां येत नाहीं. धंदा थोडाफार नुकसानींत येऊन थकबाक्या वाढणें, पैशासाठी भांडवलवाल्यांचा तगादा लागणें म्हणजे लौकरच तो धंदा बंद करणें, असें भाग्यच (!) अनेकांचे वाट्यास येतें.

व्यापारांतील किंवा उद्योगधंद्यांतील यशाविषयीं विचार करत असें आढळून येतें कीं, व्यापार उद्योगधंद्यांतील यश हें इतर अनेक गुणांपेक्षां किंवा गुणाबरोबरच त्यांत टिकाव धरून राहण्याच्या शक्तीवर (यासच चिकाटी असेंहि म्हणतात) मुख्यत्वें अवलंबून असतें. एकादा व्यवसाय किंवा व्यापार थोड्याफार नुकसानींत येतांच बंद करणें म्हणजे कायमची नुकसानी सोसणें होय! या उलट, धंद्यांत ठोकर बसतांच अनुभवानें शहाणें होऊन त्यांत योग्य त्या सुधारणा करणें व त्यांतच टिकाव धरून राहणें यामुळेंच धंद्यात प्रगति करतां येते, अनुभवानें शहाणपण शिकतां येतें व झालेली नुकसानभरपाई करून पुनः फायदा मिळवितां येतो. यासाठीच धंदा नुकसानींत आला तर त्याचा पाठपुरावा न सोडणें हेंच अंतीं शहाणपणाचें ठरतें; कारण चांगला काळ हा प्रत्येकास आलाच पाहिजे.

व्यापारांतील यशापयशाच्या कारणांचा विचार करतां त्याची छाननी खालीलप्रमाणें होतेः—

(१) अपुरें भांडवल.
(२) अनुभवाचा अभाव.
(३) वाढत जाणारी उधारी.
(४) माल खपविण्याइतकेंच त्याचे पैसे वसूल करण्याचें महत्त्व.
(५) व्यापारी व कारखानदार यांचेकडून न फसलें जाण्याची आवश्यकता.
(६) नोकर नेमतांना घ्यावयाच्या खबरदाऱ्या आणि
(७) मुख्य म्हणजे विषम परिस्थितीला तोंड देऊन त्यांत टिकाव धरून रहाण्याची असणारी आवश्यकता. (अपूर्ण)

### टॅरीफ बोर्डाच्या अध्यक्षांचें भाषण

इंडिअन टॅरीफ बोर्डाचे अध्यक्ष श्री. जी. एल्. मेहता ह्यांनीं मुंबई येथें नुकतेंच एक भाषण केलें. त्यांच्या व्याख्यानाचा विषय आपल्या अर्थव्यवस्थेला जडलेले रोग असा होता. श्री. मेहता म्हणाले, " सध्यां देश नफ्याच्या फुगवट्याच्या परिस्थितींतून उत्पादनाच्या खर्चाच्या फुगवट्याच्या कक्षेत प्रवेश करीत आहे असें दिसतें. कारण, उत्पादनाच्या खर्चात झालेल्या वाढीमुळें पदार्थांच्या किंमती वाढल्या आहेत. नफ्याच्या प्रमाणांत वाढ झाल्यामुळें किंमती वाढलेल्या आहेत असें नाहीं. वास्तविक चढलेल्या किंमतींमुळें पैसे गुंतविण्याच्या व्यवहारांत तेजी यावयास पाहिजे. निदान तशी ती येते असा सामान्य अनुभव आहे. परंतु आज तसें दिसून येत नाहीं. उलट, पैसे शिल्लक टाकण्याची लोकांची शक्ति उतरणीला लागलेली असल्यामुळें पैसे गुंतविण्याचे व्यवहार मंदीच्या चक्रांत सांपडलेले आहेत. उत्पादनाच्या खर्चात जी वाढ झाली आहे ती कमी करतां येणें हा प्रश्न फार कठीण झाला आहे. परंतु त्यावर उपाय म्हणून किंमती उतरविणें हा मार्ग नव्हे. ज्या मालाचें उत्पादन गरजेपेक्षां कमी होत आहे, त्या मालाचें उत्पादन वाढविण्यासाठीं सर्व बाजूंनीं प्रयत्न करणें हाच त्यावर खरा प्रभावी उपाय आहे. तेव्हां सध्याच्या परिस्थितींत, पैशाचें पाठबळ असणारी मागणी कमी होऊं न देता, टंचाई असणाऱ्या मालांचें आणि उपभोग्य वस्तूंचें उत्पादन वाढविणें, हा आपल्या अर्थव्यवस्थेचा हेतु असला पाहिजे."

श्री. मेहता ह्यांच्या भाषणाला टॅरीफ बोर्डाचे अध्यक्ष ह्या नात्यानें असलेलें महत्त्व नजरे आड न करूनही त्यांनीं सुचविलेले उपाय तपाशिलाच्या अभावीं अपुरे वाटतात. हे उपाय अंमलांत आणण्यासाठी प्रथमतः हिंदी अर्थव्यवस्थेंतील निरनिराळ्या गटांची पैसे शिल्लक टाकण्याची समर्थता अजमावणें जरूर आहे. आजच्या महागाईच्या काळांत, शिल्लक टाकण्याची वृत्ति असलेला मध्यमवर्ग शिल्लक टाकूं शकत नाहीं. ह्याच वर्गांतून आणि श्रीमंत वर्गांतूनच भांडवल उभारण्याची शक्यता असल्यानें प्रथम पैसे शिल्लक टाकण्याच्या त्यांच्या शक्तीबद्दल माहिति मिळविली पाहिजे. तरच भांडवलाच्या बाजारांतील मंदीचा अर्थ कळणें शक्य होईल.

### हिंदुस्थान मोटार्स लि.

बडोदें संस्थानांत नोंदलेल्या ह्या कंपनीचा ३१ मार्च १९४९ अखेरचा वार्षिक अहवाल तयार झाला आहे. कंपनीचा ताळेबंद ५ कोटी, ६ लक्ष रुपयांचा आहे. कांहीं घसारा काढून व शेअर विक्रीचा १० लाखांचा सर्व खर्च लिहून टाकून कंपनीस मागील शिलकी नफा धरून ८६,३०४ रु. नफा झाला आहे. कंपनीची कलकत्ता येथील फॅक्टरी चांगली प्रगति दाखवीत आहे. मोटारी जुळवणें सोपें असलें तरी सुटे भाग तयार करणें अवघड आहे. तें काम कंपनीनें यंत्रसामुग्री उभारून हातीं घेतलें आहे. ओखा येथील जुळणीच्या कारखान्याची आतां आवश्यकता उरलेली नाहीं. कंपनीनें एकूण २ कोटी, २२ लक्ष रुपयांच्या मालाची विक्री केली. एवढ्या मोठ्या व्यवहारास फक्त १६०० रु. डायरेक्टरांची फी खर्ची पडली आहे.

---

**बॅंकेच्या मॅनेजरास शिक्षा—** ज्वाला बॅंकेचे मुंबई शाखेचे मॅनेजर जे. एम. अंबोरटा, ह्यांना ग्रेटर बॉंबेच्या सेशन्स कोर्टानें अफरातफरीच्या गुन्ह्याबद्दल कैदेची व दंडाची शिक्षा केली. वेगवेगळ्या बॅंकांतून ज्वाला बॅंकेचीं खातीं होतीं तीं चालविण्याचा त्यांना अधिकार होता. त्याचा त्यांनीं दुरुपयोग केला, व्हाऊचर्स केलीं नाहींत, हिशेबांत नोंदी केल्या नाहींत व चेकसच्या काऊंटरफॉइल्समध्यें खाडाखोड केली, असा त्यांचेवर आरोप होता.

खून साफ करनेमें मशहूर डॉ. वामन गोपाल का सार्सापरिला

बेडेकर लोणचीं वापरा

भोर स्टेट बँक लि.
मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.
शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ६७,००० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स
श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. दृ. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. ग. धंडुके.
बॅंकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
पुणें कचेरी ५१५ बुधवार — अधिक माहितीसाठीं लिहा. रा. गो. आगाशे, बी. ए. (ऑ.) मॅनेजर.

माणिक नं. 20 कपड्याकरि[ता] उत्तम साबण
माणिक सोप वर्क्स ...कराड, (सातारा)...

### मुंबई प्रांतिक सहकारी बँक लि., मुंबई

अहवालाचे वर्षी सहकारी सोसायट्यांच्या संख्येंत व व्यवहारांत मोठी वाढ झाल्यामुळें त्यांस लागणाऱ्या पैशासाठी प्रांतिक बँकेकडील मागणीहि वाढली. त्या कारणानें बँकेनें दिलेल्या कर्जांतहि सुमारें ३ कोटींची वाढ झाली. त्यापैकीं कापड व सूत ह्यांसाठीं २ कोटी, १५ लक्ष रुपये होते. सहाजिकच वैयक्तिक कर्जें ४३ लाखांनीं कमी करावीं लागलीं. बँकेकडील व्यक्तींच्या ठेवींत २३ लाखांची वाढ झाली. तरी सहकारी संस्थांच्या ठेवींत १ कोटीची घट झाली. नियंत्रित कापड व सूत वाटपाचे कामास सहकारी सोसायट्यांना जास्त पैसा लागूं लागला त्याचा हा परिणाम आहे. ओघानेंच, बँकेची सरकारी रोख्यांतील गुंतवणूक १ कोटी, १० लक्ष रुपयांनीं उतरून ३ कोटी, ९५ लक्ष रुपयांवर आली. पण त्यानें पैशाच्या तरतेपणास बाध आलेला नाहीं. बँकेच्या ५६ शाखा १२ जिल्ह्यांत चालू आहेत. त्यांत अहवालाचे वर्षी उघडलेल्या विटा व मुरबाद ह्या दोन आणि विलीन भागांतील हिम्मतनगर आणि पालनपूर ह्या दोन शाखांचा समावेश होतो. शेतकी पत पुनर्घटना कमिटीच्या शिफारशीप्रमाणें आणि त्यावरील सरकारी ठरावाप्रमाणें बँकेची पुनर्घटना करण्यांत आली आहे, ती रजिस्ट्रारच्या मामुली मंजुरीनंतर अंमलांत येईल. अहवालाचे वर्षअखेर बँकेचें खेळतें भांडवल १० कोटी, ६२ लक्ष रुपये असून तिला ४,२८,३२२ रु. निव्वळ नफा झाला आहे. भागीदारांस ४%+१%=५% डिव्हिडंड मिळेल. श्री. वा. पुं. वर्दे ह्यांनीं ह्या वर्षीहि आपल्या अत्यंत मौल्यवान वेळाचा बराच भाग बँकेसाठी खर्चून तिची व तिच्या द्वारा प्रांतांतील सहकारी चळवळीची उत्कृष्ट सेवा केली आहे. ( चेअरमन : श्री. आर. जी. सरय्या; ऑ. मॅ. डायरेक्टर : श्री. वा. पुं. वर्दे; मॅनेजर : श्री. व्ही. एम. ठाकोर; जॉ. मॅनेजर : श्री. वाय. बी. गायतोंडे )

---

### सातारा जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि., कराड

वरील बँकेचा व्यवहार झपाट्यानें वाढत आहे. जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना १९४४–४८ ह्या पांच वर्षांत बँकेनें १,५९,३५० रु. कर्ज वाटलें होतें, तर गेल्या एकाच वर्षी १,४३,००० रु. कर्ज वाटण्यांत आलें. बँकेचे इतिहासांत एवढा मोठा व्यवहार झाल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे. वसूल समाधानकारक आहे. बँकेच्या सुरवातीपासूनच कायद्याचा अवलंब न करता बँकेच्या प्रयत्नानें व शेतकरी सभासदांच्या सचोटीस अनुसरून वसूल करण्याची खटपट केली जाते. अहवालाचे वर्षी व्यवहार ज्यास्त झाल्यानें थोडासा खर्चहि वाढणें स्वाभाविक आहे, परंतु त्याचा सुपरिणाम एक–दोन वर्षांत निश्चित दिसूं लागेल. कर्ज निवारण कायदा कलम ५५ ( जुनें ) ३२ ( नवें ) प्रमाणें जर जिल्ह्यांतील कोर्टांनीं अवॉर्ड्स केले असते, तर यापूर्वीच बँकेचें काम पुष्कळ होऊं शकलें असतें. बँकेचा ताळेबंद ४,६७,७०९ रुपयांचा आहे. त्यांत ४३,०२० रु. शेअर भांडवल व १६,२५२ रु. रिझर्व्हचे आहेत. बँकेच्या समाधानकारक दप्तराबद्दल मॅनेजर श्री. पुटाणी ह्यांचा व उत्कृष्ट मार्गदर्शनाबद्दल अध्यक्ष रावसाहेब कल्याणी ह्यांचा योग्य तो उल्लेख ऑडिटरांनीं केला आहे. वाळवे, शिराळा, तासगांव व खानापूर हे जिल्हे द. सातारा जिल्ह्यांत आतां समाविष्ट झाले आहेत आणि ह्या तालुक्यांत तर बँकेचे मोठ्या प्रमाणावर व्यवहार आहेत. तेव्हां, बँकेच्या कार्यक्षेत्रांतून हे तालुके न जाऊं देणें केव्हांहि इष्टच होईल. सरकार व त्याचें सहकारी खातें ह्या गोष्टीकडे लक्ष पुरवील अशी आशा आहे. सातारा जि. को. लँड मॉर्गेज बँकेची ही मागणी अगदीं युक्त ठरते. ( चेअरमन : रावसाहेब आ. ना. कल्याणी; मॅनेजर : श्री. एम. एस. पुटाणी. )

### दि बेळगांव बँक लि., बेळगांव

१२ जानेवारी १९४९ रोजीं वरील बँकेचें नांव शेड्यूल्ड बँकांच्या यादींत घातल्याचें हिंदुस्थान सरकारनें जाहीर केलें. दक्षिण महाराष्ट्रांत व मुंबई-कर्नाटकांत स्थापन होऊन शेड्यूल्ड बँक होणारी ही पहिलीच बँक आहे. बँकेनें ३०–६–१९४९ अखेर संपलेल्या वर्षी बिकट परिस्थितींतहि उत्कृष्ट प्रगति केली आहे. तिचें खेळतें भांडवल सुमारें १० लाखांनीं वाढलें व तें ७६,८३,७७५ रु. झालें. बँकेला ५१,५६३ रु. निव्वळ नफा झाला. भागीदारांना करमाफ ६% डिव्हिडंड देण्यास ३१,८९१ रु. लागतील. रिझर्व्ह फंडांत ११,००० रुपयांची भर पडल्यावर तो १,१६,५३० रु. होईल. इतर रिझर्व्ह २०,३१३ रुपयांचे आहेत. बँकेचा बिल डिस्कौंटिंगचा व खरेदीचा व्यवहार चांगला चालतो; त्यांत पैशाचा तरतेपणा व किफायतशीरपणा हीं दोन्हीं साधतात. बँकेनें सुमारें १७ लक्ष रुपये रोख व रिझर्व्ह आणि इतर बँकांत ठेवले असून १८½ लक्ष रुपयांची तिची इनव्हेस्टमेंट आहे. २२ शाखांच्या मार्फत बँकेची सेवा चालू आहे. ( चेअरमन: श्री. जी. व्ही. सराफ, बी. ए., एलएल. बी., वकील; मॅनेजिंग डायरेक्टर : श्री. ए. आर. नाईक, बी. ए., बी. एससी., एलएल. बी. )

---

### दि भुसावळ पीपल्स को. बँक लि., भुसावळ

८०७ सभासद, ८७,५०० रु. भाग भांडवल, १,५५,२३३ रु. रिझर्व्ह व इतर फंड, १७,१३,२४२ रु. ठेवी, अशा रीतीनें २० लक्ष, १९ हजारांच्या खेळत्या भांडवलाचा बँकेचा ताळेबंद आहे. बँकेनें त्यापैकी ६ लक्ष रुपयांचीं, खेळत्या भांडवलाच्या ३०·५% कर्जें दिलीं असून बाकीची रक्कम रोख, बँकांत व रोख्यांत ठेवलेली आहे. ह्यावरून तिचा तरतेपणा स्पष्ट होईल. परत फेडीचें प्रमाण अत्यंत समाधानकारक आहे. बुडीत व संशयित कर्जफंडांत प्रत्यक्ष बुडीत व संशयित कर्जापेक्षा पुष्कळच ज्यास्त रक्कम आहे. "प्रस्तुत बँक ही एक आदर्श सहकारी अर्बन बँक असून तिला आजची सुस्थिति प्राप्त करून देण्याचें श्रेय मॅनेजरांस व श्री. हरि सदाशिव खरे ह्यांच्यासारखा मुरब्बी सहकारी कार्यकर्त्यांच्या नेतृत्वाखालील बोर्डास आहे" असें ऑडिटरनें म्हटलें आहे. बँकेनें वैद्यकीय शुश्रूषेस लागणारीं साधनें भागीदारांना मोफत देण्याची व्यवस्था केली परंतु तिचा पुरेसा फायदा सभासद घेत नाहींत असें दिसतें. सभासदांच्या प्रॉव्हिडंट फंडांतहि फक्त ३५ सभासद सामिल झालेले आहेत. बँकेची सुस्थिति व काटकसरी कारभार अभिनंदनीय आहे. बँकेस निव्वळ नफा २०,३१२ रु. झाला. ( चेअरमन : श्री. ह. स. खरे; मॅनेजर : श्री. जीनाभाई जी. देसाई, एफ. आय. एस. ए. [ इं. ] )

---

### नायडोंगरी विविध कार्यकारी सहकारी पतपेढी लि.

अहवालाचे वर्षी सोसायटीच्या शेअर भांडवलांत १॥ पटीनें वाढ होऊन तें ११,४६० रु. झालें. साल अखेर सभासदांकडे २३,२६५ रु. येणें आहे. थकबाकीदार कोणीहि नाहीं. सरकारनें सोसायटीला कापड व धान्य दुकानें दिलीं आहेत. त्यामुळें ग्रामस्थांची व आसपासच्या १०–१२ गांवांची चांगली सोय होऊन सोसायटीसहि उत्पन्नाची बाब मिळाली आहे. शेतकऱ्यांना स्वस्त दरानें नांगर भाड्यानें व विकत दिले जातात. अशा रीतीनें सोसायटीचें उपयुक्त कार्य चालू आहे. अहवालाचे वर्षी सोसायटीस २,३९२ रु. नफा झाला. ( चेअरमन : श्री. शि. वे. पाटील; सेक्रेटरी : श्री. ना. रा. मगर )

### बँकांतील नोकरांचा पगार व तो देण्याची बँकांची पात्रता

एकापेक्षा अधिक प्रांतांत ज्यांच्या शाखा आहेत अशा बँका व त्यांचे नोकर ह्यांचेमधील वांधयाचा विचार करण्यासाठी नेमलेल्या ऑल इंडिया इंडस्ट्रिअल ट्रायब्यूनलचें काम मुंबई येथें सुरू झालें आहे. सुमारं १७० बँकांचे संबंधांत असा वांधा आहे. बंद झालेल्या बँकाहि त्यांत समाविष्ट होतात. नोकरवर्गाला पैसे देण्याच्या पात्रते-प्रमाणें बँकांची वर्गवारी कशी करावी, ह्याविषयीं नोकरांच्या प्रति-निधींत मतभेद आहे. १५ कोटींचेपेक्षां जास्त खेळत्या भांडवलाच्या व त्यापेक्षां कमी भांडवलाच्या अशी वर्गवारी अहमदाबाद–गुजराथ–सौराष्ट्राच्या नोकर प्रतिनिधींनें सुचविली आहे. इंपीरिअल बँकेच्या स्टाफ असोसिएशनच्या वतीनें प्रो. के. टी. शहा ह्यांनीं सर्व बँकांस सारखेंच लेखावें असें सांगितलें. ज्यांना किमान वेतन देतां येणार नाहीं, त्यांनीं धंदा बंद करावा, असें त्यांचें म्हणणें आहे. वैयक्तिक बँकेच्या पात्रतेवर नोकरांचा पगार अवलंबून न ठेवतां, बँकिंगच्या सबंध धंद्यांत तो एकच असावा, असें मुंबईच्या फेडरेशन ऑफ बँक एम्प्लॉईजच्या तर्फे श्री. फडके ह्यांनीं मागणी केली.

• ठेवींत घट झाल्यामुळें बँकांचा नफाही कमी झाला आहे, असें सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. कॅप्टन ह्यांनीं सांगितलें. बँकांनीं दिलेलीं कर्जें पूर्वीसारखीच असलीं तरी करंट खात्यांतील पैसे कमी झाले व मुदती ठेवींचा उपयोग कर्जाकडे ज्यास्त प्रमाणांत करावा लागला, असा त्यांचा मुद्दा होता. त्यांत नफ्याचें प्रमाण कमी उरतें. श्री. शांतीलाल शहा ह्या कामगारांच्या प्रतिनिधींचें म्हणणें असें, कीं कर्जावरील व्याजाचा दर वाढला आहे; त्यामुळें बँकांचा नफाहि वाढणारच.

---

### तुलनात्मक उत्पादनक्षमता

ऑस्ट्रेलिअन सरकारचे अर्थशास्त्रज्ञ मि. कोलिन क्लार्क यांनीं आंतरराष्ट्रीय मनुष्य–तासी (एका तासांत मनुष्य जेवढें उत्पादन करूं शकेल, तेवढें उत्पादन) उत्पादनाची तुलनात्मक पाहाणी केली. त्यांत अमेरिकेची युद्धोत्तरकालीन उत्पादनक्षमता रशियाच्या साडेआठपट असल्याचें आढळून आलें.

ह्या पाहाणींतील माहितीवरून असें दिसतें कीं, रशियासारख्या विस्तृत व मोठ्या लोकसंख्येच्या देशाची गणना पूर्व युरोपांतील मागासलेल्या देशांच्या वर्गांत व्हावी इतकी त्याची राष्ट्रीय उत्पा-दनक्षमता कनिष्ठ श्रेणीची आहे.

इटलीचा अपवाद सोडला तर औद्योगिक दृष्ट्या प्रगत असे जगांतील सर्व देश रशियाच्या पातळीपेक्षां पुष्कळच वर आहेत असें मि. क्लार्क यांचें अनुमान आहे. त्यांच्या आंकड्यांवरून असें दिसतें कीं; ब्रिटनची राष्ट्रीय उत्पादनक्षमता रशियापेक्षां चार पटींनीं व फ्रान्सची अडीचपटींनीं अधिक आहे.

रशियांतील आर्थिक प्रगति अनिश्चित असून उत्पादनक्षमतेच्या ताज्या आंकड्यावरून असें दिसतें कीं, रशियाची उत्पादनक्षमता सन१९०० च्या पातळीवर आहे. शेतींत मुळींच प्रगति न झाल्यानें औद्योगिक प्रगतीला छेद दिला गेला असें मि. क्लार्क यांना आढळून आलें.

---

### दर माणशीं साडेचार तारा

तारा पाठविण्याचे बाबतींत ऑस्ट्रेलियनांचा अनुक्रम जगांत पहिला लागतो. दरमाणशीं वार्षिक तारांचें प्रमाण तेथें ४½ पडतें. नॉर्वेत तें २½ व अमेरिकेंत १¾ इतकें आहे.


# बांठिया बँक लिमिटेड

हेड ऑफिस—पनवेल जि. कुलाबा.

| | |
|---|---|
| अधिकृत व खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. ४,७७,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. ४२,००० |
| खेळतें भांडवल | रु. ५०,००,००० |

शाखा

| | |
|---|---|
| मुंबईः–६५।६७ झव्हेरी बझार. | पुणेंः–१२६८ भवानी पेठ. |
| अहमदनगरः–बझार पेठ. | बेलापूररोडः–पोस्टासमोर, |
| कल्याणः–शिवाजी चौक. | भिवंडीः–बझार पेठ. |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

| | |
|---|---|
| श्रीमंत शेट रतनचंद भिकमदास बांठिया-अध्यक्ष. | श्रीमंत गंगाधर विष्णु ऊर्फ नानासाहेब पुराणिक. |
| ,, ,, केशरचंद आनंदराम बांठिया. | श्री.रा. केशव गोविंद लिमये बी. ए. एलएल., बी. वकील पनवेल. |
| ,, ,, खिवराज आनंदराम बांठिया. | ,, जे. एस. कासट बी. कॉम. |
| ,, ,, विरदीचंद भूरचंद बांठिया-मॅ.डायरेक्टर. | ,, एस. आर. घासवाला (सेंट्रल ऑटो सर्व्हिस) |
| ,, ,, चुनिलाल जसरूप मुनोथ. | ,, ताराचंद दगडूराम भंडारी कापडाचे व्यापारी अहमदनगर. |
| ,, ,, रवजी भिमजी रंगपरिया.(ऑ.मॅजिस्ट्रेट.) | |

श्री. रा. गणेश भैरव साठे, जनरल मॅनेजर.

★ *बँकिंगचीं सर्व प्रकारचीं कामें केलीं जातात.* ★

*विशेष माहितीसाठीं समक्ष भेटा अगर लिहा.*

श्री. वालचंद सी. श्रीमाळ, बी. कॉम.
मॅनेजर, पुना ब्रँच.

# बँक ऑफ पूना, लिमिटेड.

(शेड्यूल्ड बँक)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. २५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. १२,५०,००० |

मध्यम वर्गीयांना मासिक उत्पन्नांतून एका रकमेनें मुलांच्या शिक्षणाचा खर्च भागवत नाहीं. दरमहा ५ रु. नियमित शिल्लक टाकल्यास पांच वर्षांत ३०० रुपये स्वतःचे होतात. अशा बचत योजनेच्या रकमेवर ३ टक्क्यापर्यंत व्याज मिळण्याची सोय.

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

जास्त माहितीसाठीं मुख्य कचेरीस अगर शाखांस लिहा.

मुख्य कचेरीः–४५५ रविवार पेठ, पुणें नं. २

स्थानिक शाखाः–(१) भवानी पेठ. (२) सदाशिव पेठ.

बाहेरगांवच्या शाखाः– (१) टिळक चौक, सोलापूर, (२) वखार भाग, सांगली.


हें पत्र पुणें, पेट मांवुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं ' दुर्गाधिवास ', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.